# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

**(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०**

**http://www.dteau.org Email- roaurangabad.dte@gmail.com**


तात्काळ/महत्वाचे.

जाक्र/तंत्रशिविकाऔ/शिक्षण/ईबीसी/२०१७

दिनांक :- 2 MAR 2017

प्रति,

**प्राचार्य,**

शासकीय/अनुदानित/विना अनुदानित अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र,

तंत्रनिकेतने,एचएमसीटी,एम.बी.ए.,एम.सी.ए. पदविका/पदवी /पदव्युत्तर पदवी/

अभ्यासक्रमाच्या संस्था

**औरंगाबाद विभाग**

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०१६-१७ प्रवेशीत झालेल्या विद्यार्थ्यासाठी "राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना" ऑनलाईन अर्जाची छाननी करणे बाबत.**

संदर्भ :- मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१५/अर्थसं/ईबीसी/ ऑनलाईन/ २०१६-१७/२४६ दिनांक २८/०२/२०१७

उपरोक्त संदर्भिय विषयी कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये प्रवेशीत असलेल्या व आर्थिकदृष्टया मागावर्गीय विद्यार्थ्यांच्या ई.बी.सी.व वसतीगृह निर्वाह भत्ता अर्जाची तपासणी या विभागीय कार्यालयाकडून करण्यात आलेली आहे.

या पत्रान्वये आपणास सुचित करण्यात येते की, ई.बी.सी. व वसतीगृह निर्वाह भत्ता योजने साठी विद्यार्थ्यांनी भरलेल्या अर्जामध्ये आढळून आलेल्या त्रुटीची पुर्तता झालेली असल्यास अशा विद्यार्थ्यांचे अर्ज व काढण्यात आलेल्या त्रुटीचे कागदपत्र या कार्यालयास दिनांक ०७/०३/२०१७ पर्यंत सादर करण्यात यावे. जेणे करून त्रुटीची पुर्तता केलेल्या अर्जांना या कार्यालयाकडून ऑनलाईन मान्यता देण्यात येईल. ऑनलाईन मान्यता दिलेल्या अर्जाची संस्थांनी ऑनलॉईन नोंद घ्यावी व त्यामध्ये त्रुटी आढळल्यास दि.०७/०३/२०१७ पर्यंत या कार्यालयास अवगत करावे.

ज्या संस्था दिनांक ०७/०३/२०१७ नंतर त्रुटी या कार्यालयास सादर करतील अशा संस्थेतील ई.बी.सी.व वसतीगृह निर्वाह भत्ता योजनेच्या अर्जांना या कार्यालयाकडून ऑनलाईन मान्यता देण्यात येणार नाही व त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांच्या होणा-या आर्थिक नूकसानीस संस्था जबाबदार राहील याची संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत :- १. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनलाय,म.रा.मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

२. या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर अपलोड करण्यासाठी.

EBC 2015